**रे. दि. मु. क्रमांक १०२/२००८ मधील नि. क्र. १३१ खालील आदेश.**

**बाबु भिंगारे व इतर विरुध्द मधुकर पवार**

**(आदेश पारित दिनांक ०६.११.२०२३)**

---

सदरचा अर्ज हा प्रतिवादींनी त्यांच्या विरुद्ध झालेला दिनांक २३.०२.२०२३ रोजीचा "वादीचा उलटतपास नाही" असा आदेश रद्द व्हावा या करिता दाखल केला आहे.

प्रतिवादीनुसार, वादी यांचा अर्धा उलटतपास झालेला आहे. उर्वरित उलटतपास घेणेकामी कोर्टात कामकाज नेमलेले होते. परंतु काही कारणास्तव वादीचा उलटतपास घेता आलेला नाही असा आदेश झालेला आहे. प्रस्तुतचे कामी वादीचा उर्वरित उलटतपास घेणे अत्यंत आवश्यक आहे. उलटतपास घेतला तर न्यायदानात मदतच होणार आहे. वादीचे कोणतेही नुकसान नाही. त्यामुळे सदरचा अर्ज मंजुर करण्यात यावा.

वादीच्या कथनानुसार, प्रतिवादीचा अर्ज खोटा व लबाडीचा असुन प्रतिवादी हे गेले दोन वर्ष कधीही कोर्टात आलेले नाहीत. सबब, अर्ज फेटाळण्यात यावा. यदाकदाचित मंजुर करण्यास आला तर ५,०००/– कॉस्ट वर मंजुर करण्यात यावा.

अर्ज व अर्जावरील से चे अवलोकन केले. सदरचा दावा हा अचल संपत्तीबाबतचा आहे. अशा दाव्यात दोन्ही पक्षांचे म्हणणे पटलावर येणे आवश्यक आहे. “उलटतपास नाही” असा जरी आदेश पारित झाला असला तरी आपली बाजु मांडण्याकरीता प्रतिवादीला संधी मिळणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. परंतु, प्रतिवादीच्या विलंबामुळे सदरचा दावा लांबणीवर पडला आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

# <u>आदेश</u>

प्रतिवादी विरुद्ध झालेला दिनांक २३.०२.२०२३ रोजीचा उलटतपास नाही चा आदेश कॉस्ट रुपये २००/- वर मंजुर करण्यात येतो.

Sd/-
(के. ए. पट्टेबहादुर)
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, खंडाळा.

दिनांकः- ०६.११.२०२३

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील मजकूर हा मुळ आदेशाप्रमाणे शब्द न शब्द जशास तसा व बरोबर आहे.

न्यायालयाचे नाव - सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, खंडाळा

लघुलेखकाचे नाव - सौ. सुवर्णा संकेत शिंदे

Sd/-
(एस. एस. शिंदे)
लघुलेखक (ग्रेड - ३)